# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी खुर्द, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे - ४१२ ४०५

दूरध्वनी ०२१३३-२२५९०० फॅक्स ०२१३३-२३०५८३

Website – www.gcoeara.ac.in, e mail – gcoeara@gmail.com


जा.क्र. शाअसंमअ / आस्था / २०१५ / 1543 दि. 21 MAY 2015

## कार्यालयीन आदेश

विषय - संस्थेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या हजेरीच्या नोंदी ठेवणेबाबत

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या हजेरीच्या नोंदीसाठी बायोमेट्रिक मशीन वापरणे अनिवार्य आहे. या संदर्भामध्ये असे आदेश देण्यात येतात की या संस्थेमधील सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या बोटाचे ठसे बायोमेट्रिक मशीनवर नोंदविणे, प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांना या मशीनसाठी एक विशिष्ट क्रमांक देणे, हजेरीच्या मासिक नोंदी संकलित करणे, त्या संदर्भातील आवश्यक ती माहिती कार्यालयास वेळोवेळी देणे, इत्यादी कामाची जबाबदारी या आदेशाद्वारे श्रीमती ए. एम. खळे, कॉम्प्यूटर प्रोग्रॅमर यांचेकडे सोपविण्यात येत आहे. त्यांनी वेळोवेळी याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी. असेही आदेश देण्यात येतात की या कामासाठी श्री. एस. पी. गेडाम, डेटा एन्ट्री ऑपरेटर यांनी श्रीमती ए. एम. खळे यांना वेळोवेळी आवश्यक ते सहकार्य करावे.

(प्रा. श्री. वि. जोशी)
प्र. प्राचार्य,
शा. अ. व सं. म., अवसरी

o/c

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

१) प्रबंधक
२) श्रीमती ए. एम. खळे, कॉम्प्यूटर प्रोग्रॅमर, यांना प्रबंधक यांचेमार्फत
३) श्री. एस. पी. गेडाम, डेटा एन्ट्री ऑपरेटर, यांना प्रबंधक यांचेमार्फत
४) आस्था. १ / ३ / ४ - त्यांना कळविण्यात येते की त्यांनी संस्थेमध्ये बदलीने अथवा नवीन नियुक्तीने हजर झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या बोटाचे ठसे घेण्यासाठी श्रीमती ए. एम. खळे, कॉम्प्यूटर प्रोग्रॅमर यांचेकडे संपर्क साधण्याचे सूचित करावे.